# वसंत आबाजी डहाके यांच्या 'चित्रलिपी'तील महानगरीय जाणिवा

प्रा.डॉ. सुरेश खोब्रागडे
मराठी विभाग,
विदर्भ कला-वाणिज्य महाविद्यालय,
लाखनी जि. भंडारा -४४१८०४
महाराष्ट्र, भारत

*महाराष्ट्रात लघुअनियतकालिकांची चळवळ जेव्हा फोफावली होती; त्या दरम्यान कवितेत रमलेलं एक नाव पुढे आलं. आपल्या विशिष्ट आकृतीबंधानं जीवनवास्तव कवितेत मांडून रसिकांच्या हृदयात विलक्षण कालवाकालव आणि अत्यंत अस्वस्थता निर्माण करणारे कवी म्हणून साऱ्यांच्या ओठात रेंगाळणारे ते नाव म्हणजे वसंत आबाजी डहाके! प्रस्तुत निबंधात वसंत आबाजी डहाके यांच्या 'चित्रलिपी'तील महानगरीय जाणिवांचा मी शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'चित्रलिपी'मध्ये 'महानगर', 'तुझं हे शहर' आणि 'संत्रस्त शहर' अश्या तीन कविता महानगरीय, शहरी जीवन जाणिवा असलेल्या दिसतात. त्या कवितांच्या अनुषंगानं प्रस्तुत संशोधकांनी नोंदवलेली काही निरीक्षण ...*

'योगभ्रष्ट', 'शुभवर्तमान', 'शुन:शेप' आणि 'चित्रलिपी' अशा एकाहून एक ताकदवान कवितासंग्रहाने स्वत:चे एक वेगळे अस्तित्व निर्माण करुन वसंत आबाजी डहाके यांनी स्वत:ची विशिष्ट छाप मराठी साहित्यात उमटविली. 'योगभ्रष्ट' जेव्हा बाहेर पडला त्यावेळी डहाक्यांची कविता दुर्बोध असल्याचा ठपका काहींनी ठेवला. कविता केवळ सरळ विधानांच्या स्वरूपातच असली पाहिजे असे कुठे आहे? मुक्तछंद या काव्यप्रकारात विविध अनवट प्रतिमा निर्माण करता येतात. कवीची त्या-त्या वेळची ती भावावस्था असते. वसंत आबाजी डहाके यांच्या काही कवितात दुर्बोधता दिसते. 'योगभ्रष्ट' मध्ये ती आली असली, मात्र इतर संग्रहात ती फारशी पहायला मिळत नाही. त्यांच्या काही कवितासंग्रहांमधून महानगरीय जाणीवांचा आढळ दिसतो. 'चित्रलिपी'मध्ये 'महानगर', 'तुझं हे शहर' आणि 'संत्रस्त शहर' अश्या तीन कविता महानगरीय, शहरी जीवन जाणिवा असलेल्या दिसतात. त्या अनुषंगाने घेतलेला हा शोध प्रस्तुत शोधनिबंधातून मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

**महानगरीय जाणिवांचा शोध :-**

महानगरांचं भयान वास्तव कवीनं अनुभवलंय. शहराच्या तळाशी त्यांना विकृत, विरूप, ओंगळवानं असं जग दिसतं. वास्तवतेचा तळ ढवळतांना कवी हतबल होतात, अस्वस्थ होतात. या शहराची भाषांच काही वेगळी आहे. 'वीज दिव्यांच्या झगमगत्या झुंबरासारखे महानगर लखलखून उठेल आणि कुणालाही कळणार नाही अशा भाषेत काहीतरी पुटपुटेल'. (महानगर) असे कवी म्हणतात. यातील 'कुणालाही कळणार नाही अशा भाषेत' या ओळीत सूचितार्थता आहे. ही ओळच शहराचं रूप, त्याचं भावविश्व अशा अनेक घटकांचा रूपशोध आपल्यासमोर सादर करते. 'महानगर' या कवितेत शहराच्या उगवण्यापासून तो त्याच्या मावळण्यापर्यंतचा सारा चित्रपट कवी उभा करतात. आकाशावरचा भगवा रंग हळूहळू काळवंडत जाणे, नंतर समुद्राच्या निळया पाण्यावर भुरळ पडल्यासारखा काळिमा पसरत जाणे अशा हया पायऱ्या ओलांडल्यानंतर मग शहर लखलखेल. शहराचा प्रसव काळ कवी इथे उभा करतात. अगदी प्रसंगच उभा करण्याचे चित्र उभ करण्याचं आणि कमालीचं कथानकच रसिकांपुढे उभं करण्याचा सामर्थ्य कवीला उत्तम साधले आहे. 'महानगर' या शीर्षकावरूनच आपल्याला एका मोठया शहराची कल्पना येते. अगदी लख्ख प्रकाश, दिवसासारखा उजेड हा रात्रीही असतो. दिवस की रात्र हा संभ्रम पाखरांना पडल्याचे कवी सांगतात. पाखरांची संभ्रमावस्था सांगतांना ते म्हणतात, 'घाईघाईने ठरलेल्या झाडाकडे परततील विचारात ते झाड तिथंच आहे की नाही' (महानगर). ही विवंचना दिवस की उजेड असा संभ्रम दर्शविणारी आहे. मुंबई, पुणे, कलकत्ता, बंगलोर किंवा दिल्ली अशा एखादया महानगरात घेवून जाणारी ही कविता आहे.

महानगरातील लोकांची घराकडे परत जाण्याची धावपळ. ही धावपळ तरी कसली, स्पर्धाच असते नुसती म्हणूनच या धावपळीला 'लोकलगाडया गिळत जातील माणसांना आणि रस्ते स्वयंचलित वाहनांना.' (महानगर) असे कवी म्हणतात. लोकलगाडयांचं माणसांना गिळणं आणि रस्त्यांचं स्वयंचलित वाहनांना गिळणं हया आशयसमृध्द प्रतिमातून महानगरातलं धावपळीचं आणि धकाधकीचं जीवनच कवी प्रकर्षानं आविष्कृत करतात. 'दिवसभरातील यातना सहन करून सहकारी वसाहतीही सामोऱ्या जातील. त्या वसाहतीच्या प्रांगणातील मुलांचे खेळ थांबतील' ही सगळी रात्र सुरु होण्याची चिन्हे कवी प्रभावीरितीने मांडतात. जगण्याची धडपड मात्र आई-बापांचे माथे भडकविणारी असेल. आपल्या कुटुंबांचं कसं होईल ही भीतीच आई-वडिलांचा थरकाप उडविणारी असेल. कवितेतला हा एक टप्पा इथपर्यंतचा.

कवितेत दुसरा टप्पा सुरू होतो तो खाणावळीचे गजबजणे, उपहारगृहातील गर्दी, मद्यालयात शौकिनांची गर्दी इथून ही रात्र पुढे सरकत जाते. चित्रपटगृहातली करूणामय दृश्य, त्यातून हळवा झालेला श्वास ही दृश्य कवितेत कवी मांडतात आणि त्या दृश्यामुळे कवितेतल्या भावप्रदेशात अजून काळोख माजतो. त्या दरम्यान झपाटयाने महानगरात झालेल्या हालचाली कवी अचूक टिपतात. ते म्हणतात,

**"कुणी तळहाताएवढया चतकोर जागेत जगण्याची वेलबुट्टी काढतील,**
**तर कुणी आयुष्याच्या नोंदवहीत एक धारदार रेघ ओढतील.**
**समुद्रकाठावर अजूनही कुणीतरी एकाकीच बसून असेल,**
**समुद्रात, शहरात, जगण्यात चित्त असेल किंवा नसेल"**

('महानगर', पृ.७)

येणाऱ्या रात्रीला कवी कापणीचा हंगाम म्हणतात. कुणी आपल्या इच्छांचे कोयते घासतील तर कुणी आयत्या पिठावर रेघोटया ओढतील, कुणी उद्याचे वायदे करतील. असे असंख्य मतलबी, धूर्त, लबाड व्यवहार महानगर करतील. काही उघडपणे तर काही झाकूण. मात्र हेच महानगराचं वास्तव आहे. याच रोजच्या व्यवहाराने महानगर थकून जाते आणि मध्यरात्रीनंतर केव्हातरी डोळे मिटून निपचित पडून राहते. असे जगण्याचे सारे रहस्य काळजात घेवून महानगर अतिशय अस्वस्थ जगतो. कवी त्या कवितेचा समारोप करतांना म्हणतात, 'नुस्ते रस्ते असतात पहुडलेले काही काळ निवांत, शुध्द गेल्यासारखे; रस्त्याच्या छातीवर पडलेले असते गेल्या दिवसाचे पाखरू अर्धवट मेल्यासारखे' ('महानगर', पृ.७). अत्यंत व्यापक विचारवलये निर्माण करून भाषाद्रव्य आणि आशयद्रव्यांचं सुरेख संमिश्रण कवी इथे निर्माण करतात.

'तुझं हे शहर' ही वसंत आबाजी डहाके यांची शहराचं रूपभान अधोरेखीत करणारी कविता आहे. समकालीन वास्तवजग आपल्या स्वतंत्र शैलीने कवी चित्रित करतात. महानगराचा अधोलोक स्तंभित करणारा, कधी अंगावर रोमांच उभं करणारा अशा संमिश्र भावनांचे रसायन कवी ताकदीने उभे करतात. कवीला शहर कधी आवडलेच नाही. तिथल्या उंच इमारतीत त्यांचा श्वास घुटमळतो. गल्लीबोळातून चालतांना जीव गोळा करूनच चालावं लागतं. 'तुझं हे शहर' या शीर्षकातच एकतर्फी संवादाच्या खुणा स्पष्ट दिसतात. 'तुझं' या नावात कुणी मैत्रीण असावी, प्रेयसी असावी किंवा मित्र असावा. त्याच्याशी संवाद साधतांना शहर न आवडण्याचं कवी कारण सांगतात. ते म्हणतात,

**"तुझी मैदानं गजबजलेली व्यार्धींनी,**
**तुझे बागबगिचे खलवतं-कारस्थानांनी,**
**तुझे रस्ते निर्दय आणि खुनशी डोळयाचे."**

('तुझं हे शहर', पृ.४७)

आणि असे हे शहरातले सुऱ्यांसारखे दिवस कवीचं अस्तित्व कापत जातात. या सगळया प्रसंगांना, घटनांना कवी चुकविण्याचा प्रयत्न करतात. पण त्या घटना अटळ असतात. रोजच मग कत्तल करणाऱ्यांच्याच मुक्कामावर जावं लागतं. शहरांकडून आता कसल्याच चांगल्या गोंष्टींची कवीला अपेक्षा नाही. आपल्या आयुष्यातले चांगले दिवस म्हणजे भरडणारं जातं होय असा कवीला प्रत्यय आलेला आहे. कवी पुढे म्हणतात,

**"तू बाजारपेठ आहेत, तू कत्तलखाना आहेस,**
**तू नरक आहेस पृथ्वीवरचा असं म्हणून मी तुला शाप देतो**
**आणि अधिकच गुंतत जातो तुझ्या जाळयात....!"**

('तुझं हे शहर', पृ.४७)

शहराला विसाव्या शतकाची कवी उपमा देतात. हे विसावे शतक अस्थिर, असुरक्षित आणि अशाश्वत असल्याची कवीला खात्री आहे. त्या शहरावरचं आकाशही मळकट चिंधीसारखं आणि शहराच्या बाजूला असलेला, समुद्रही अतिशय गंजलेला. शहरात आगगाडया आणि बसेसची भयंकर गर्दी असते. खरंतर ही वाहनं सतत स्वत:भोवती फिरत असतात; काळोखातल्या आंधळयासारख्या. कवी पुढं म्हणतात,

**"तुझ्या प्रत्येक पुलाखाली, कमानीखाली**
**आणि अजस्त्र भवनातील खांबाआड, खिडक्यांआड**
**गूढ चेहरे दडलेले असतात.**
**तुझं शहरं ओझी लादतं आणि बांडगुळासारखं**
**सारं सत्व शोषून घेतं"**

('तुझं हे शहर', पृ.४७)

RESEARCH JOURNEY

म्हणूनच कवी शहराला महाकाय कीटक म्हणतो आणि त्याचा आत्मतृप्त चेहरा नाकारतो. पण हे शहराचं वास्तव नाकारुन जायचं कुठं? म्हणून कातडीवरील रोगाप्रमाणे शहराला नाईलाजानं कवी स्वीकारतो; कधीतरी काळोखात झोपी गेलेले छोटे छोटे कीटक जागे होतील आणि शहराचा अवाढव्य आत्मतृप्त चेहरा कुरतडतील या आशेवर !

'संत्रस्त शहर' ही कविता त्यातील विशेष प्रतीक आणि प्रतिमाने एका वेगळयाच भावप्रदेशात घेवून जाते. यातील अर्थवलये विलक्षण आकार, लय आणि रुपलावण्य आविष्कृत करतांना दिसतात. शब्दांची समर्पक रुजवात आणि शब्दकळेचा समृद्ध आशेय गर्भ या कवितेत पहायला मिळतो. एक आत्मनिवेदनातून ही कविता आकाराला येते. या कवितेत दिसते एक शहरातील कॅन्टिन. इथेही शहर म्हणजे महानगरच! या कॅन्टिनमधल्या वायफळ हालचालींच्या रिंगणात कवीला भयंकरच अस्वस्थ वाटतं. ही अस्वस्थता गुदमरणारी असते. ते म्हणतात,

**"गॉथिक जिण्याच्या पायऱ्या गच्च बसतात**
**छातीत दाटलेल्या श्वासासारख्या.**
**कॉरिडॉर्समध्ये शब्दांच्या घोळक्यासारख्या**
**जमलेल्या मुलांपलीकडे आभाळ दिसतं."**

(संत्रस्त शहर, पृ. ७२)

अशा या वातावरणात अचानक उमळलेल्या दुखण्यासारखं कवीला वाटून जातं. इथं ते रमत नाहीत. रमण्यासारखं तिथ काहीही नसतं. त्यांना भयाण उदासिनता त्या कॅन्टिनमध्ये दिसते. तिथले कंटाळवाणे टेबल, शिणलेल्या खुर्च्या, अस्वस्थ फडफडणारी पुस्तकांच्या पानांची पाखरं, जाळीत अडकून गुरगुरणारा पंखा ही एकूणच दृश्य त्या उदासिनतेत, अस्वस्थतेत आणखीनच भर टाकणारी आहे. ते शेवटच्या ओळीत म्हणतात,

**"मी शिकवू लागतो समोरच्या इल्लेजिबल चेहऱ्यांना.**
**भाषा म्हणजे काय तर मानवी मुखातून निघणाऱ्या ध्वनींची रचना...**
**तेव्हा बाहेर असतं आजारातून उठलेलं**
**एक संत्रस्त शहर."** (संत्रस्त शहर, पृ. ७२)

'संत्रस्त शहर' या शीर्षकातच दु:खद अनुभूतीची भावसूचकता पहायला मिळते. निराशेच्या, अंधाराच्या आणि तीव्र काळोखाच्या खानाखुणा या कवितेत जागोजागी आहेत.

**अनोखे प्रतिमाविश्व :-**

वसंत आबाजी डहाके यांच्या महानगरीय जाणिवांच्या कवितेत अनोखे असे प्रतिमाविश्व पहायला मिळते. पहिल्यांदाचं शब्दांचा अनोखा नजराणा विविधांगी भावच्छटांचे अनोखे मिलन दर्शविणारा आहे. त्यातील काही वाक्येची वाक्येच चिंतन करायला लावणारी आहेत. काही प्रतिमा आणि वाक्य पुढील प्रमाणे आहेत.

१. मद्यालयांना कंठ फुटेल. (महानगर)
२. हळवा श्वास तुटेल. (महानगर)
३. येणारी रात्र म्हणजे कापणीचा हंगाम आहे. (महानगर)
४. कुणी इच्छांचे कोयते घासतील. (महानगर)
५. महानगर थकून गेलेले. (महानगर)
६. रस्त्याच्या छातीवर पडलेले असते गेल्या दिवसाचं पाखरू अर्धवट मेल्यासारखे.(महानगर)
७. मैदान गजबजलेली व्याधींनी. (तुझं हे शहर)
८. तुझे रस्ते निर्दय आणि खुनशी डोळयांचे. (तुझं हे शहर)
९. सुऱ्यांसारखे दिवस. (तुझं हे शहर)
१०. तुझं आकाश मळकट चिंधीसारखा. (तुझं हे शहर)
११. कंटाळलेलं टेबल. (संत्रस्त शहर)
१२. शिणलेल्या खुर्च्या. (संत्रस्त शहर)
१३. अस्वस्थ फडफडणारी पुस्तकाच्या पानांची पाखरं. (संत्रस्त शहर)
१४. गुरगुरणारा पंखा. (संत्रस्त शहर)
१५. आजारातून उठलेलं एक संत्रस्त शहर. (संत्रस्त शहर)

अशी अनेकांगी शब्दकळा, भावलहरींची आशयगर्भ जीवनसूत्र यांची मनोवेधक गुंफण कवितेत एक वेगळाच भावप्रदेश निर्माण करते. त्यातील वाक्यच जीवनाचा ठाव घेणारी होतात. भावनेच्या तळाशी खोलवर नेणाऱ्या तिथल्या प्रतिमा आपली व्यापकता आणखी व्यापक करीत जातात. 'कुणी तळहाताएवढया चतकोर जागेत जगण्याची वेलबुट्टी काढतील'

(महानगर). या ओळीत महानगरातील जागेचा प्रश्न, जगण्याचा प्रश्न किती जिवघेणा झाला आहे त्याचं चित्र कवी आपल्या डोळयासमोर उभं करतात. 'समुद्रकाठावर अजूनही कुणीतरी एकाकीच बसून असेल' (महानगर). या ओळीतलं एकाकीपण अचूक टिपल्या गेलय 'येणारी रात्र म्हणजे कापणीचा हंगाम आहे'(महानगर). हे सांगून एकूणच जीवनाच्या इच्छा आकांक्षाची सतत कापणी करावी लागते. सगळी स्वप्नच मारून टाकावी लागतात. अशा मध्यमवर्गीयांच्या व्यथा, वेदना त्या ओळीतून कवी सुचवितात. मध्यमवर्गीयांचे क्ष-किरणच कवी आपल्या कवितेतून आविष्कृत करतात. 'शुद्ध गेल्यासारखी पहुडलेले निवांत रस्ते' या शब्दातून चिंतनाचा आवाका अफाट आणि विस्तीर्ण करण्यात कवी यशस्वी होतात. शहर म्हणजे कत्तलखाना आहे, बाजारपेठ आहे, नरक आहे असं सांगून समकालीन मानवी जीवनाची गजबजलेली व्याधी आपल्या कवितेत कवी शब्दांकित करतात. 'निर्दयी रस्ते', 'खुनशी डोळे', 'सुऱ्यांसारखे दिवस' (तुझं हे शहर). यामुळे कवीचं अस्तित्व धोक्यात येणं स्वाभाविक आहे. पण याच वातावरणात राहावं लागतं. हे वास्तव त्यांच्या दु:खात भर घालते. मात्र कवी फारच आशावादी आहेत. काळोखात झोपी गेलेले छोटे छोटे कीटक एक दिवस जागे होतील आणि शहराला कुरतडून टाकतील असे कवीला वाटते. 'छोटे छोटे कीटक' ही उपमा कवींनी ज्यांच्या वाटयाला दु:ख, वेदना, काळोख आणि अंधाराशिवाय काहीच आजवर मिळालं नाही. अशा असंख्य उघडयावर जीवन जगणाऱ्या समस्त अतृप्त माणसांना उद्देशून लिहिली असावी असं वाटते. हा शोषित वर्ग एक दिवस क्रांती करेल असे कवीला वाटते. या महानगराने त्याचं अस्तित्व गडप केलेलं आहे. कॅन्टिनच्या समोरचं दृश्य कवीला व्याकुळ करून गेलं. ते शिकवितात समोरच्या इल्लेजिबल चेहऱ्यांना 'भाषा म्हणजे काय तर मानवी मुखातून निघणाऱ्या ध्वनींची रचना.. .'. यातून ही भाषा शहराला समजत नाही, असा अर्थबोध होतो. त्यातल्या त्यात निर्जीव वस्तूंची भाषा तर अजिबात शहराला कळत नाही. अत्यंत भावसूचकता असलेल्या अनवट आणि अन्वर्थक प्रतिमांची सुरेख गुंफन कवी करतात.

**निष्कर्ष :**

१. वसंत आबाजी डहाके यांच्या महानगरीय कवितेत मध्यमवर्गीय समाजाची तीव्र वैफल्यग्रस्तता पहायला मिळते.
२. महानगरातील तुटलेपण, हरवलेपण आणि अपार विखुरलेले जीवनवास्तव रेखाटणाऱ्या जाणिवा डहाके यांच्या कवितेत पहायला मिळतात.
३. डहाक्यांच्या कवितेत भयाण काळोख जरी असला तरी आशावादही पहायला मिळते.
४. अनवट आणि अन्वर्थक प्रतिमासृष्टीची गर्दी डहाक्यांच्या कवितेत पहायला मिळते.
५. डहाक्यांच्या आत्मसंवादी कवितेत खोल गहिऱ्या चिंतनखुणा तात्विक आणि मूलगामी आशयाला उजागर करताना दिसतात.

**समारोप :-**

वसंत आबाजी डहाके यांच्या 'चित्रलिपी'तील महानगरीय जाणिवांचा शोध घेतांना बारीकसारीक खाचखळग्यातून मला जावं लागलं; त्यात रक्तबंबाळ करणाऱ्या अनेक वाटा, ठेच लागून विलक्षण अंगभर कळ उठावी अशा काही अनुभूती अतिशय मनाची घालमेल करून गेल्या. एक प्रवाहित्व आणि गतित्व त्यांच्या कवितेत दिसून आले. कुठेही शब्दांच्या मायाजालात दुर्बोधता दिसून आली नाही. काही शब्द विलक्षण गूढ अतर्क्य वाटतात. पण ही सुरवातीची अवस्था असते. पुढे त्या शब्दांचे अर्थ गवसतात.

डहाक्यांच्या महानगरातलं वास्तव म्हणजे एक जीवनभाष्यचं वाटतं. त्यातील अस्वस्थ करणारं भेदक चित्र शब्दांभोवती अर्थवलय निर्माण करीत जन्माला येतं. जीवनाचे अनेक पदर, अनेक आयाम, अनेक रंग गवसू लागतात. दु:खाचंच

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

सौंदर्यशास्त्र कवी मांडतात. अनाकलनीय जीवनाचा रूपशोध, रूपवेध, रूपबंध कवी उलगडतांना दिसतात. त्यांच्या कवितेतील हा जीवनवेध समस्त भारतातील मध्यमवर्गीयांचं दु:ख आत्यंतिकपणे मांडत जाणारा आहे. मध्यमवर्गीयांच्या अपार तुटलेपणाच्या वेदना, त्यांच्या जगण्याचे अनोखे प्रमेय उलगडतांना दिसतात. सूक्ष्म चिंतनशीलता हा डहाक्यांचा मूळ गुणधर्म आहे. ते शब्दांच्या तळाशी, बुडाशी इतके बुडून जातात की, पुढे एकामागून एक अर्थवलये निर्माण करीत शब्दांच्या नुसत्या सरीच्या सरी बरसु लागतात. ही सगळी शब्दकळा जीवनाची अवकळा अधोरेखीत करते. नाद, लय, ताल यांचे संमिश्र सूर लागतात. जीवनाची प्रचंड गुंतागुंत डहाक्यांच्या शब्दांतून अभिव्यक्त होत जाते. त्यातील अनुभवाची प्रगल्भता व्यापक आहे. समकालीन जीवनानुभवावर प्रकाश पाडणारी त्यांची कविता चिंतनशीलतेचा बाज घेवून प्रसवलेली आहे. प्रसववेदनेच्या स्पष्ट खाणाखुणा कवितेत पहायला मिळतात. चित्रांना लिपीची परिभाषा देवून शब्दातून असंख्य चित्र कवी निर्माण करतात.

जागतिकीकरणाच्या काळातून आपण सगळेच जात आहोत. जागतिकीकरणात मनुष्य स्वार्थी झालेला आहे. तो, त्याचा कुटुंब आणि कधीकधी तर फक्त 'तो'च. एवढयापुरतं त्याचं जग झालंय. मनुष्य आत्मकेंद्रित झालाय. स्वत:भोवतीच तो फिरतोय. म्हणूनच त्याला महानगरातल्या झगमगाटातलं रोमॅंटिक जग आवडतं. त्यात तो रममाण होतो. बाजूला उघडयावर अर्धनग्नवस्थेत उपाशीतापाशी उन्ह, वारा, पावसात फुटपाथच्या वांझ आसऱ्याने राहणारा याच देशातला माणूस त्याला दिसत नाही. अशा विदिर्ण करणाऱ्या जगाचा अनुभव हाच डहाक्यांचा कविताविषय आहे असे मला वाटते. माणसांचं माणसांपासून तुटणं ही भारतीय संस्कृतीला लाथाडणारी नवी येत असलेली संस्कृती कविता अपार दु:खाच्या खाईत लोटणारी आहे; असा त्यांची कविता वाचतांना प्रत्यय येतो. महानगरातला हा सारा अधोलोक तुटलेपणाच्या भावविश्वात घेवून जातो. त्यांची कविता सामाजिक विसंगतीवर भाष्य करते. कमालीची अतृप्ती, भूक आणि अंतर्मनातला ताण यांचे संसूचन करणारी त्यांची कविता आहे. त्यातील सृजनशील सौंदर्यरूप, त्याचा कथात्मक आविष्कार, त्यातील नाटयमयता, मानवी जीवनाची पडझड उजागर करतांना दिसतो. एकूणच त्यांच्या महानगरातला हा प्रवास काटेरी आहे, बोचरा आहे, अंतर्मन विलक्षण गदगदून टाकणारा आणि व्याकूळ करणारा असा आहे.

RESEARCH JOURNEY

**टीप** : सदरहू निबंधातील सगळे संदर्भ आणि पृ.क्र. 'चित्रलिपी' या वसंत आबाजी डहाके यांच्या कवितासंग्रहातील आहेत. जानेवारी २०१२ साली प्रसिद्ध झालेली ही तिसरी आवृत्ती असून लोकवाड्.मय गृह, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ यांनी ही आवृत्ती प्रकाशित केली.